# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

ePaper
नवराष्ट्र
Paschim Maharashtra | 26 October 2025 | Page 2

**सांगीतिक** — संगीत, संस्कृती आणि भक्तीचा मनमोहक संगम; 'तू सप्तसूर माझे' कार्यक्रम

# दिवाळी पहाट कार्यक्रमाने पाटणवासीय मंत्रमुग्ध

पाटण, (वा.) दिवाळी पाडव्याच्या निमित्ताने पाटण शहरात आयोजित दिवाळी पहाट कार्यक्रमात संगीत, संस्कृती आणि भक्तीचा मनमोहक जल्लोष अनुभवायला मिळाला. कोयना एज्युकेशन सोसायटी, पाटण रोटरी क्लब आणि बाळासाहेब देसाई महाविद्यालय, पाटण यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या सोहळ्यात पाटणचे रसिक न्हाऊन निघाले.

कार्यक्रमाची सुरुवात विजय गायकवाड यांच्या सुरेल आवाजातील ओंकार स्वरूपा या गाण्याने झाली. त्यांच्या गायकीने रसिक मंत्रमुग्ध झाले. निवेदक मनोहर यादव यांनी आपल्या खास शैलीत गाण्यांचा इतिहास आणि सह्याद्रीचा इतिहास वर्णन करत संगीत मैफल सजवली. तू सप्तसूर माझे या संकल्पनेअंतर्गत सादर करण्यात आलेल्या कार्यक्रमात भावगीत, भक्तिगीत, लोकसंगीत आणि मराठी-हिंदी चित्रपट गीतांचा संगम साधण्यात आला. दीपाली माने यांनी सुंदर ते ध्यान उभे विटेवरी या भक्तिगीताने भावविश्व रंगवले. विजय गायकवाड यांनी उजळून आले आभाळ आणि संजीव चव्हाण यांनी विठ्ठला तू वेडा कुंभार सादर करून वातावरण भारावून टाकले तसेच शोधीशी मानवा आदी गीतांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले.




## ग्रामदैवत लक्ष्मीदेवीवर आधारीत गीत, भक्तिगीते सादर करून जागवला भक्तिभाव

राजेंद्र गायकवाड यांनी माझे माहेर पंढरी या प्रसिद्ध भक्तिगीताने रसिकांची मने जिंकली. त्यांनी गायलेल्या छू कर मेरे मन को, किया तूने क्या इशारा या याराना चित्रपटातील किशोर कुमार यांच्या गीताने कार्यक्रमात रोमँटिक वातावरण निर्माण झाले. पूजा भिसे यांनी फुलले रे क्षण माझे या गाण्याने भावविभोर वातावरण निर्माण केले. प्रथमेश कदम यांनी मिळे ज्याची मुक्ती आणि अनिल बोधे यांनी पाटणच्या ग्रामदैवत लक्ष्मीदेवीवर आधारित गीत सादर करून भक्तिभाव जागवला.

## जय जय महाराष्ट्र माझा गीताने सांगता

कार्यक्रमाची सांगता जय जय महाराष्ट्र माझा या देशभक्तिपर गीताने झाली. याप्रसंगी कोयना शिक्षण संस्थेचे संचालक याज्ञसेन पाटणकर, सुहास देशमुख, डॉ. बी. बी. पाटील, डॉ. नांगरे, प्राचार्य डॉ. शिरीष पवार, प्रा. बी. एन. पाटील, माजी प्राचार्य गौतम झुळझुळे, प्रा. बजरंग काटे, धैर्यशील पाटणकर, शिलादेवी पाटणकर, प्रा. डॉ. विनायक राऊत, प्रा. डॉ. भरत जाधव, प्रा. डॉ. विलास कळंत्रे आदींसह शहरातील संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम संस्मरणीय बनवला.

## संगीत कार्यक्रमाचा पाटणकरांनी लुटला आनंद; स्वच्छता कर्मचाऱ्यांचा सन्मान

याप्रसंगी पत्रकारांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पाटण नगरपंचायतीच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना दिवाळी भेट देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. मनोहर यादव यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सतीश गायकवाड यांनी आभार मानले. दिवाळीच्या आनंद सोहळ्यात संगीताचा असा बहारदार मेळ साधत दिवाळी पहाट कार्यक्रमाने पाटण वासियांच्या मनात अविस्मरणीय ठसा उमटवला.